

धुळे : संविधान बांधिलकी महोत्सवांतर्गत वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांसमवेत मान्यवर.

# स्पर्धेतूनही वाढेल संविधानाप्रति आदर

## ॲड. एम. एस. पाटील : संविधान बांधिलकी महोत्सवांतर्गत वक्तृत्व स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. ३० : स्पर्धा म्हणजे युवा पिढीसाठी ज्ञान ग्रहण करण्याचे माध्यम आहे. अशा स्पर्धेच्या माध्यमातूनही युवा पिढीत संविधानाप्रति आदर व अध्ययनाची वृत्ती वाढेल, असे प्रतिपादन संविधान बांधिलकी महोत्सवाचे अध्यक्ष ॲड. एम .एस .पाटील यांनी केले. दरम्यान, संविधान बांधिलकी महोत्सवांतर्गत घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रफुल्ल माळी याने प्रथम, तर दिव्या राजपूत व चैतन्य पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला.

धुळे नागरी संयोजन समितीतर्फे येथील कल्याण भवनात रविवारी (ता.३०) संविधान बांधीधिलकी महोत्सवांतर्गत वक्तृत्व स्पर्धा झाली. ॲड. पाटील अध्यक्षस्थानी होते. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील, एस. यू. तायडे, डॉ. संजय पाटील, डॉ. सुरेश बिन्हाडे, प्रा. डॉ. सुरेंद्र मोरे, प्रा. डॉ. गोपाळ निंबाळकर, प्रा. डॉ. दीपक बाविस्कर, ॲड. विनोद बोरसे, सुरेखा नांद्रे आदी प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमात प्रारंभी महात्मा गांधी यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेसाठी 'भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्ष'', '१९५० पूर्वीचा आणि संविधान स्वीकृतीनंतरचा भारत'', 'संविधान आणि स्त्री- पुरुष समानता' असे विषय देण्यात आले होते. स्पर्धेत एकूण २४ स्पर्धकांनी सहभाग घेतला. ॲड. पाटील यांनी मार्गदर्शन केले. अंनिसचे पाटील यांनी स्पर्धकांचे कौतुक केले. स्पर्धेत विषयाची मांडणी करताना येथून बाहेर गेल्यावरही तो मुद्दा विषय अस्वस्थ करणारा, विचार करण्यास प्रवृत्त करणारा असला पाहिजे, तरुणांनी संविधानाचे महत्त्व जाणून घ्यावे असे ते म्हणाले. नवल ठाकरे, नितीन बागूल, पोपटराव चौधरी, एल. आर. राव, डॉ. शरद वाणी, रामदास जगताप, रणजीत शिंदे, प्रा. भिमराव कढरे, श्री. चौधरी, श्री. हंडोरे आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. मोरे, प्रा. डॉ. निंबाळकर, प्रा. डॉ. बाविस्कर, श्रीमती नांद्रे यांनी स्पर्धेचे संयोजन केले. प्रा. डॉ. बाविस्कर, ॲड. बोरसे, प्रा. प्रशांत कसबे यांनी परीक्षण केले. चिन्मयी बाविस्कर हिने सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सहकार्य लाभले.

### स्पर्धेतील विजेते असे

प्रथम- प्रफुल्ल माळी, द्वितीय (विभागून)-दिव्या राजपूत व चैतन्य पाटील, तृतीय- प्रज्ञा जोशी, उत्तेजनार्थ- प्रियंका पवार व गायत्री वाणी. प्रथम पारितोषिक एक हजार रुपये, द्वितीय सातशे रुपये (विभागून), तृतीय पाचशे रुपये तर उत्तेजनार्थ शंभर रुपये असे पारितोषिकाचे स्वरूप होते. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र, संविधान प्रास्ताविकाही देण्यात आली.


AI QUAD CAMERA
Shot by prof.dipali dhangar
2023/06/08 19:37

